# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/08/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०.५ किमी अंतरावर वार्ड क्र. ०८ नरखेड येथे दिनांक १०/०८/२०२३ चे १२:०० वा. ते १३:३० वा. पर्यंत फिर्यादी नामे– पुरूषोत्तम मनिराम उबनरे, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०८ नरखेड हे मुख्य दरवाज्याला कुलुप लावुन सरकारी दवाखाना नरखेड येथे गेले व दुपारी ०१.३० वा. दरम्यान घरी परत आले असता घराचा दरवाजा हा उघडा दिसला व घराचे दाराला लावलेले कुलूप तोडुन जिन्याजवळ पडलेले दिसले यावरून घरात जावुन पाहीले असता घरातील बेडरूम मध्ये ठेवलेले गोदरेज कंपनिचे लोखंडी कपाटामध्ये ठेवलेल्या बॅग मधिल १) ४ ग्रॅम सोन्याचे कानातील रिंग किंमती अंदाजे १२,०००/– रू. २) ५ ग्रॅम सोन्याची अंगठी किंमती अंदाजे १५,०००/– रू. ३) ३ जोड चांदीच्या पायपट्टया किंमती अंदाजे १०,०००/– रूपये व ४) अलमारीत ठेवलेले नगदी ६०,०००/– रूपये असा एकुण ९७,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने घराचे दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बांद्रे पोस्टे नरखेड मो. नं. ९१५८२९१२३२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा सुसुंद्री येथे दिनांक ०६/०८/२०२३ चे १८/३० वा. चे दिनांक ०७/०८/२०२३ चे २०/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेंद्र श्यामराव ठोसरे, रा. सुसुंद्री यांचे वर्डीलोपार्जीत घर असुन ते घर बंद राहते. त्या घरात फिर्यादी व त्याचे वडील अधुन मधुन जात असतात त्या घरात फिर्यादीच्या आईचे वापरीचे जुनी भांडी असुन दिनांक ०६/०८/२०२३ रोजी नेहमी प्रमाणे वडीलांचे घरी गेले होते व सायंकाळी घराचे दार बंद करून घरी आले होते. दि. ०७/०८/२०२३ रोजी सायंकाळी ०८/३० वा. फिर्यादी व त्याचे वडील जुन्या घरी गेले असता फिर्यादीचे घराची कडी सकाळी उघडलेली दिसली व पाहीले तर घरातील जुने वापराचे भांडे १) ०८ गंज वजन १० कि.लो. २) पितळीचे कोपर ०६ वजन ६ कि.लो. ३) पितळचे ०४ गुंड वजन १० किलो. ०४) पितळचे १० ग्लास वजन ३ किलो ५) पितळचे ०५ गडवे वजन ०२ किलो एकुण पितळ ३१ किलो व तांब्याचे तिन गडवे १ किलो कास्याचे ३ ताट २ किलो तसेच जर्मनचे ०६ गंज व त्यावरील ०६ झाकण्या वजन २० किलो असे दिसून आले नाही घरातील पितळीची भांडी वजन ३१ किलो किंमती ६२००/–रू तांबा भांडे ०१ किलो ३००/– रू. कास्याचे भांडे २ किलो किंमती अंदाजे ८००/– रू जर्मन भांडे २० किलो २०००/– रू असा एकुण ९,३००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरानी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पोटभरे मो. नं. ९९२३००२६६४ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा बस स्टॉप काटोल येथे दिनांक ०९/०८/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक १०/०८/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेश गिरीधारलाल जैयस्वाल, वय ४७ वर्ष, रा. धंतोली ता. काटोल याचे बस स्टॉप काटोल जैयस्वाल कॉम्पलेक्स येथे देशी दारूचे दुकान असुन फिर्यादीचे दुकानाचे कुलुप फोडुन दुकानातील ड्रॉप मधील नगदी ७९८००/—रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोलते पोस्टे काटोल मो. नं. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**